तरुण भारत

# कुलगुरूंच्या आश्वासनानंतर

# विधी विद्यार्थ्यांचे उपोषण स्थगित

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठांतर्गत विधी विभागाच्या उन्हाळी परीक्षा ऑनलाईन घ्या, यासाठी लॉ कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठाच्या गेटवर उपोषण केले. याची दखल घेत कुलगुरूंनी लॉ कॉलेजच्या सर्व प्राचार्यासोबत चर्चा करून परीक्षा कशा पध्दतीने घेणार यासंदर्भात निर्णय देऊ, असे आश्वासन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी विद्यार्थ्यांना दिले. त्यामुळे विद्यार्थ्यांनी केलेले उपोषण स्थगित केले आहे.

निवेदनात, मुंबई, पुणे, नागपूर, छत्तीसगड विद्यापीठांनी सर्व पारंपारिक विषयांच्या उन्हाळी परीक्षा ऑनलाईन घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्याप्रमाणे शिवाजी विद्यापीठाने विधी विभागाच्या सर्व परीक्षा ऑनलाईन घेतल्या पाहिजेत. उन्हाळी सत्रातील परीक्षा ऑनलाईन घ्या. त्यानंतर जूनपासून सर्व परीक्षा ऑफलाईन पध्दतीने घ्या, अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली आहे.

24 MAY 2022

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शाहूंच्या चित्रप्रदर्शनातून कोल्हापूर स्कूलचा जागतिक दर्जा अधोरेखित

## कुलगुरू शिर्के; चित्रकला स्पर्धेचे पारितोषिक वितरण



कोल्हापूर : स्पर्धेतील विजेत्यांसमवेत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील. डॉ. मानसिंग टाकळे, डॉ. भारती पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, हर्षवर्धन मणिपद्म आदी.

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी सप्ताहाअंतर्गत घेतलेल्या चित्र प्रदर्शनाच्या माध्यमातून कोल्हापूर स्कूलचा जागतिक दर्जा अधोरेखित झाला, असे गौरवोद्‌गार कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी काढले.

शिवाजी विद्यापीठात राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी सप्ताह आयोजित राजर्षी शाहू महाराजांविषयीच्या चित्रकला प्रदर्शनाचे पारितोषिक वितरण सोमवारी व्यवस्थापन परिषद सभागृहात कुलगुरू डॉ. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. स्पर्धेत इचलकरंजीच्या ललित कला महाविद्यालयाची विद्यार्थिनी सोनाली पोवारने प्रथम क्रमांक पटकावला. कलामंदिर महाविद्यालय, कोल्हापूरची सुप्रिया सुतार (द्वितीय), तर रा. शि. गोसावी कलानिकेतन, कोल्हापूरच्या सत्यम शिंगारेने (तृतीय) क्रमांक पटकावला.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, प्रदर्शनातून तरुण कलाकारांच्या अभिव्यक्तीची ताकद समजून आली. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाच्या हीरक महोत्सवाच्या निमित्ताने या कलाकारांनी विद्यापीठ परिसराचे त्यांना आवडेल, त्या पद्धतीचे चित्रण त्यांच्या चित्रकलेच्या माध्यमातून करावे. प्रदर्शन व स्पर्धेत कोल्हापूर परिसरातील ललित कला महाविद्यालयांतील ६० विद्यार्थी सहभागी झाले होते. दहा प्रथितयश कलाकारांची चित्रे प्रदर्शनात होती.

यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, हर्षवर्धन मणिपद्म यांच्यासह विद्यार्थी व पालक उपस्थित होते. राजर्षी शाहू स्मृती शताब्दी सप्ताह समितीच्या अध्यक्षा डॉ. भारती पाटील यांनी प्रास्ताविक केले. संयोजक डॉ. मानसिंग टाकळे यांनी स्पर्धेचा निकाल जाहीर केला.

सकाळ



कोल्हापूर : राजर्षी शाहू चित्र प्रदर्शन व स्पर्धेतील विजेत्यांसमवेत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. मानसिंग टाकळे, डॉ. भारती पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे, हर्षवर्धन मणिपद्म.

# चित्र प्रदर्शनातून कोल्हापूर स्कूलचा दर्जा अधोरेखित

## कुलगुरू डॉ. शिर्के; चित्रकला प्रदर्शनात पोवार प्रथम

कोल्हापूर, ता. २३ : राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी सप्ताहात चित्र प्रदर्शनाच्या माध्यमातून कोल्हापूर स्कूलचा जागतिक दर्जा अधोरेखित झाला, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. शिवाजी विद्यापीठात २ ते ६ मे दरम्यान आयोजित चित्रकला प्रदर्शन स्पर्धेच्या पारितोषिक वितरणप्रसंगी ते बोलत होते. इचलकरंजीच्या ललित कला महाविद्यालयाची विद्यार्थिनी सोनाली पोवार प्रथम आली. व्यवस्थापन परिषद सभागृहात कार्यक्रम झाला. डॉ. शिर्के म्हणाले, ''प्रदर्शनातून कलाकारांच्या अभिव्यक्तीची ताकद समजली. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाच्या हीरकमहोत्सव निमित्ताने कलाकारांनी विद्यापीठ परिसराचे त्यांना आवडेल, त्या पद्धतीचे चित्रण करावे. त्या संदर्भातील स्पर्धेची सविस्तर घोषणा लवकरच करू. या स्पर्धेतील विजेत्यांनी उपक्रमात सहभाग जरूर नोंदवावा.''

एकूण ६० विद्यार्थी सहभागी झाले. त्याशिवाय, दहा प्रसिद्ध कलाकारांची चित्रेही होती. युवराज्ञी संयोगीताराजे छत्रपती व ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी प्रदर्शनास भेट देऊन विद्यार्थ्यांचे कौतुक केले होते.

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, हर्षवर्धन मणिपद्म, हृषीकेश उपस्थित होते. राजर्षी शाहू स्मृती शताब्दी सप्ताह समितीच्या अध्यक्ष डॉ. भारती पाटील यांनी स्वागत केले. डॉ. मानसिंग टाकळे यांनी निकाल जाहीर केला.

## निकाल अनुक्रमे असा

**प्रथम :** सोनाली पोवार (ललित कला महाविद्यालय, इचलकरंजी), **द्वितीय :** सुप्रिया सुतार (कलामंदिर महाविद्यालय, कोल्हापूर), **तृतीय :** सत्यम शिंगारे (रा. शि. गोसावी कलानिकेतन, कोल्हापूर). **उत्तेजनार्थ** - अवधूत मृदंगे (कलामंदिर महाविद्यालय, कोल्हापूर), सुप्रिया पाटील (रा. शि. गोसावी कलानिकेतन, कोल्हापूर), साक्षी पांगिरे (दळवीज् आर्टस्, कोल्हापूर), रोहित गायकवाड (दळवीज् आर्टस् कोल्हापूर) आणि समृद्धी मंडलिक (रा. शि. गोसावी कलानिकेतन, कोल्हापूर)

लोकमत



शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित राजर्षी शाहू चित्रप्रदर्शन आणि स्पर्धेतील विजेत्यांना सोमवारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. यावेळी शेजारी मानसिंग टाकळे, भारती पाटील, व्ही. एन. शिंदे, हर्षवर्धन मणिपद्म, आदी उपस्थित होते.

# 'स्मृती शताब्दी' चित्रकला स्पर्धेत सोनाली पोवार प्रथम

## शिवाजी विद्यापीठातर्फे केले होते आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी सप्ताहअंतर्गत आयोजित चित्रकला स्पर्धेत इचलकरंजीच्या ललित कला महाविद्यालयाची विद्यार्थिनी सोनाली पोवार हिने प्रथम क्रमांक पटकावला. विद्यापीठात २ ते ६ मे दरम्यान घेण्यात आलेल्या चित्रकला प्रदर्शनाचे पारितोषिक वितरण व्यवस्थापन परिषद सभागृहात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते सोमवारी करण्यात आले.

यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, हर्षवर्धन मणिपद्म, हृषिकेश, आदी उपस्थित होते. डॉ. भारती पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. मानसिंग टाकळे यांनी निकाल जाहीर केला. दरम्यान, या स्पर्धेत सुप्रिया सुतार (द्वितीय, कलामंदिर महाविद्यालय), सत्यम शिंगारे (तृतीय, रा.शि. गोसावी कलानिकेतन), अवधूत मृदंगे (कलामंदिर महाविद्यालय), सुप्रिया पाटील (रा. शि. गोसावी कलानिकेतन), साक्षी पांगिरे, रोहित गायकवाड (दळवीज् आर्ट्स), समृद्धी मंडलिक (उत्तेजनार्थ, रा. शि. गोसावी कलानिकेतन) यांनी यश मिळविले. या स्पर्धेमध्ये कोल्हापूर परिसरातील ललित कला महाविद्यालयांतील एकूण ६० विद्यार्थी सहभागी झाले. त्यांना प्रमाणपत्रे देण्यात आली.

### हीरक महोत्सवानिमित्त लवकरच स्पर्धा

या चित्रप्रदर्शनाच्या माध्यमातून कोल्हापूर स्कूलचा जागतिक दर्जा अधोरेखित झाला, असे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले. विद्यापीठाच्या हीरक महोत्सवाच्या निमित्ताने या कलाकारांनी विद्यापीठ परिसराचे त्यांना आवडेल, त्या पद्धतीचे चित्रण त्यांच्या चित्रकलेच्या माध्यमातून करावे. त्यासंदर्भातील स्पर्धेची सविस्तर घोषणा लवकर करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
2 4 MAY 2022 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रदर्शनातून कोल्हापूर स्कूलचा जागतिक दर्जा पुन्हा अधोरेखित

- कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे गौरवोद्‌गार
- चित्रकला स्पर्धेत इचलकरंजीची सोनाली पोवार प्रथम

प्रतिनिधी
कोल्हापूर

राजर्षी शाहू महाराज स्मृती शताब्दी सप्ताहांतर्गत आयोजित चित्र प्रदर्शनाच्या माध्यमातून कोल्हापूर स्कूलचा जागतिक दर्जा अधोरेखित झाला, असे गौरवोद्गार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी काढले.

शिवाजी विद्यापीठात राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी सप्ताहांतर्गत आयोजित चित्रकला प्रदर्शनाचे पारितोषिक वितरण व्यवस्थापन परिषद सभागृहात कुलगुरू डॉ. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते झाले. यप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. स्पर्धेत इचलकरंजीच्या ललित कला महाविद्यालयातील सोनाली पोवारने प्रथम क्रमांक पटकावला.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, प्रदर्शनातून तरुण कलाकारांच्या अभिव्यक्तीची ताकद समजून आली. त्यामुळे विद्यापीठाच्या हीरक महोत्सवानिमित्त या कलाकारांनी विद्यापीठ परिसराचे त्यांना आवडेल, त्या पद्धतीचे चित्रण चित्रकलेतून करावे. त्या संदर्भातील स्पर्धेची घोषणा लवकरच करू, या उपक्रमात सहभाग नोंदवावा, असे आवाहन त्यांनी केले.

चित्रकला प्रदर्शन स्पर्धेमध्ये परिसरातील ललित कला महाविद्यालयांतील ६० विद्यार्थी सहभागी झाले. दहा प्रतिथयश कलाकारांची चित्रेही प्रदर्शनात होती. प्रदर्शनास डॉ. जयसिंगराव पवार, श्रीमंत संयोगिताराजे छत्रपतींनी भेट दिली होती. प्रदर्शनात सहभागींना प्रमाणपत्रे देण्यात येणार आहेत. डॉ. भारती पाटील यांनी स्वागत केले. संयोजक डॉ. मानसिंग टाकळे यांनी निकाल जाहीर केला. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, हर्षवर्धन मणिपद्म उपस्थित होते.

**विजेते असे :** प्रथम : सोनाली पोवार, ललित कला महाविद्यालय, इचलकरंजी. द्वितीय : सुप्रिया सुतार, कलामंदिर महाविद्यालय, कोल्हापूर. तृतीय : सत्यम शिंगारे, रा. शि. गोसावी कलानिकेतन, कोल्हापूर. उत्तेजनार्थ : अवधूत मृदंगे (कलामंदिर महाविद्यालय, कोल्हापूर), सुप्रिया पाटील (रा. शि. गोसावी कलानिकेतन, कोल्हापूर), साक्षी पांगिरे (दळवीज्‌ आर्टस इन्स्टिट्यूट कोल्हापूर), रोहित गायकवाड (दळवीज्‌ आर्टस इन्स्टिट्यूट कोल्हापूर) आणि समृद्धी मंडलिक (रा. शि. गोसावी कलानिकेतन, कोल्हापूर).

24 MAY 2022

क्रांतिसिंह

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्तुति उपक्रमामुळे विद्यापीठाची देशभर स्तुती

केंद्र सरकारच्या 'विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाच्या स्तुति (Synergistic Training program Utilizing the Scientific and Technological Infrastructure) या विशेष प्रशिक्षण उपक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठाच्या अत्याधुनिक विश्लेषणात्मक उपकरण सुविधा केंद्र (DST SAIF CFC) सुमारे अडीच कोटींचा प्रकल्प मंजूर करण्यात आला. आपत्कालीन अभ्यासक्रम आणि कार्यशाळा यांच्या माध्यमातून विविध उपकरणे आणि विश्लेषणात्मक तंत्राबद्दल जागरुकता वाढवण्यासाठी स्तुती हा उपक्रम सुरू करण्यात आला. तसेच स्तुती कार्यक्रम सुरू करण्यामागचा हेतू मानवी संसाधन तयार करणे व सर्वांना मुक्त प्रवेश आणि देशभरात पायाभूत सुविधांच्या पुरवठ्याचे विस्तृतीकरण वाढवून एकंदरीत देशभरात ज्ञान क्षमता वाढवणे हा आहे. विज्ञान तंत्रज्ञान अधिविभाग (DST), जी शैक्षणिक संस्थांमधील संशोधन विकास सुविधांचा विस्तार करते त्या योजनेस पूरक अशी योजना म्हणजे 'स्तुति ' होय. स्तुति ही प्रशिक्षण कार्यक्रमाची परिकल्पना करते व त्याचबरोबर अत्याधुनिक उपकरणे निर्मिती सर्व पायाभूत सुविधा यांची पारदर्शक विभागणी याबाबत आग्रही असते.

या अंतर्गत आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमात प्रत्येक विद्यापीठ/शैक्षणिक संस्था यांना शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरमार्फत जवळपास ८, ८३, ५०० रुपये एवढी रक्कम हस्तांतरित करत आहोत. प्रशिक्षण कार्यक्रमासाठी सहभागी पात्रता निकष पुढीलप्रमाणे::-

व्यक्ती मूळ भारतीय वंशाचा असावा, .किमान शैक्षणिक पात्रता- पदव्युत्तर पदवी (विज्ञान), बी.टेक.( टेक्नॉलॉजी), प्राध्यापक/संशोधक/पोस्ट डॉक्टरेट फेलो/ संशोधन-विकास मध्ये सक्रिय सहभागी होणारे उद्योजक ,.यजमान संस्था वगळता इतर संस्थांकडून ३ पेक्षा जास्त व्यक्तीना प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये सहभागी होता येणार नाही.

संपूर्ण देशातील २८ राज्यांपैकी फक्त महाराष्ट्र, गुजरात, आंध्र प्रदेश, त्रिपुरा, उत्तर प्रदेश, कर्नाटक, तेलंगणा, राजस्थान आणि झारखंड या राज्यांत तर ८ केंद्रशासित प्रदेशापैकी दिल्ली आणि चंदीगड या २ ठिकाणी या उपक्रमाला निधी मिळालेला आहे. या १३ पैकी केवळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर हे असे केंद्र आहे, ज्याच्या सहयोगाने या प्रकल्पाकरिता आतापर्यंत १४ विविध संस्थांनी स्तुति कार्यक्रम घेण्याची तयारी दर्शवली आहे. या उपक्रमामुळे निश्चितच शिवाजी विद्यापीठाचे नाव देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचेल आणि याचे श्रेय जाते ते म्हणजे प्रा. डॉ.आर.जी. सोनकवडे यांना. कारण त्यांच्या अथक प्रयत्नांतूनच हा प्रकल्प शिवाजी विद्यापीठास मंजूर झाला आहे.

प्रा.डॉ.आर.जी. सोनकवडे हे शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील अत्याधुनिक विश्लेषणात्मक उपकरण सुविधा केंद्र (DST SAIF CFC) चे अधिविभागप्रमुख म्हणून कार्यरत आहेत, तसेच आत्ता शिवाजी विद्यापीठातील भौतिकशास्त्र अधिविभागात प्राध्यापक पदा वर रुजू आहेत. त्यांनी 'आंतर राष्ट्रीय त्वरक केंद्र ',नवी दिल्ली येथे वरिष्ठ वैज्ञानिक म्हणून त्यांनी कार्य केले तसेच बाबा साहेब भीमराव आंबेडकर मध्य वर्ती विद्यापीठ लखनऊ येथे स्कूल फॉर फिजिक्सचे डीन होते. विविध राज्यस्तरीय, केंद्रीय, डीमड् विद्यापीठ स्तरावर वैधानिक समितीचे सदस्य होते. त्यांना अध्यापन आणि संशोधनातील २४ वर्षांपेक्षा जास्त अनुभव आहे. त्यांनी आजपर्यंत विविध विद्यापीठे आणि वैज्ञानिक संघटना येथे वैविध्यपूर्ण कामगिरी केली आहे, त्यांच्या या प्रचंड मोठ्या अनुभवाचा फायदा स्तुति प्रशिक्षण कार्यक्रमासाठी होतो आहे. शैक्षणिक विद्याशाखा, शिक्षकेत्तर कर्मचारी, भागधारक यांची कठोर मेहनत व समर्पण यांनी शिवाजी विद्यापीठ देखील ग्रामीण स्तरावरील विद्यार्थ्यांना शिकण्याची सोय एवढेच मर्यादित नसून देशपातळीवर बौद्धिक सक्षमतेने परिपूर्ण हे सिद्ध केले. हाच वारसा विद्याशाखेतील तरुण प्राध्यापक, युवक संशोधकांनी पुढे चालवला. यामुळेच शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर हे शक्तिशाली विद्यापीठ अशी जगभर ओळख निर्माण झाली. येथे अनेक नवोन्मेष जागृत करणारे प्रकल्प सुरू आहेत व अनेक एजन्सी, संस्थांकडून यासाठी विपुल प्रमाणात निधी देखील उपलब्ध होत आहे. संशोधकांच्या संशोधनातून उत्कृष्ठ संशोधन पेपर प्रकाशित होत आहेत. प्रा.डॉ.आर.जी. सोनकवडे यांच्या परिश्रमाची पोच पावती म्हणून सर्व केंद्रांनी एवढ्या लवकर उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन सदर कार्यक्रम यशस्वी करण्याची ग्वाही दिली. प्रा. सोनकवडे यांचे विशेष कौतुक करताना विविध अधिविभागातील तज्ज्ञ मंडळी इतर केंद्रांना प्रा. सोनकवडे यांचे उदाहरण देऊन त्यानुसार अनुसरण करावयास सुचवतात.

स्तुति प्रकल्पाअंतर्गत शिवाजी विद्यापीठ ग्रामीण भागातील कॉलेजमधील विद्यार्थी व इतर विद्यापीठात मधील विद्यार्थ्यांना वैज्ञानिक प्रशिक्षण देण्यासाठी प्रयत्नशील आहे. सदर प्रकल्पाच्या उद्घाटन प्रसंगी देशातील शास्त्रज्ञ, मान्यवर मंत्री व विविध राज्यांचे सचिव उपस्थित राहण्याची शक्यता आहे. शिवाजी विद्यापीठ इतर १८ ठिकाणी निधी देऊ करत आहे. या प्रकल्पाअंतर्गत काश्मीर,गोवा,नागपूर, मणिपूर, लखनौ उत्तर प्रदेश, गुवाहाटी आसाम, राजस्थान, केरळ, कर्नाटक, गुजरात, हैदराबाद, तामिळनाडू, बंगाल, पाँडिचेरी इ. सारख्या विविध १८ विद्यापीठांच्या समन्वयाने प्रत्येकी ७ दिवसांचे प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात येणार आहे. त्यापैकी १४ संस्थांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून, काश्मीर विद्यापीठात दिनांक २३ ते २९ मे, वेल्लोर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथे ४ ते १० जुलै, आय. आय. टी. जोधपूर येथे ८ ते १४ ऑगस्ट, डॉ.बाबासाहेब भीमराव आंबेडकर केंद्रीय विद्यापीठात २२ ते २८ ऑगस्ट, बिर्ला इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड सायन्स, पिलानी, गोवा कॅम्पस येथे ५ ते ११ सप्टेंबर, मंगलोर विद्यापीठ, मंगलोर, कर्नाटक येथे २६ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर, केरळ विद्यापीठ, केरळ येथे १० ते १६ ऑक्टोबर, आयआयटी, इंदूर येथे ३१ ऑक्टोबर ते ६ नोव्हेंबर, उत्तर बंगाल विद्यापीठ, दार्जिलिंग येथे १४ ते २० नोव्हेंबर नागपूर विद्यापीठ, नागपूर येथे ५ ते ११ डिसेंबर २०२२ रोजी हा प्रशिक्षण कार्यक्रम पार पडणार आहे. या प्रकल्पाचे प्रमुख डॉ. राजेंद्र सोनकवडे हे प्रत्येक ठिकाणी आवर्जून उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. स्तुति उपक्रमामुळे शिवाजी विद्यापीठाचे देशामध्ये आणि देशाबाहेरही नाव होत आहे. या प्रत्येक प्रशिक्षण शिबिरासाठी ८.८३ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. एकंदरीतच ज्ञानक्षेत्रास 'सुजलाम सुफलाम' करण्यामध्ये शिवाजी विद्यापीठातील प्रा. राजेंद्र सोनकवडे, माजी वरिष्ठ शास्त्रज्ञ (आययुएसी, न्यू दिल्ली) हे खूप अग्रस्थानी आहेत. त्यांचे जगभरातून सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेपासून आजपर्यंत विद्यापीठाच्या जडणघडणीमध्ये या विद्यापीठाचे नाव मोठे करण्यामध्ये बऱ्याच वरिष्ठ मंडळींचा तसेच आजी माजी विद्यार्थ्यांचा मोलाचा वाटा आहे. विद्यापीठातील तरुण प्राध्यापकांनी हा वारसा पुढे चालू ठेवला आहे. देशभरात हा कार्यक्रम आयोजित करण्यासाठी विविध आय.आय.टी., केंद्रीय विद्यापीठे, राज्य विद्यापीठांकडून स्वीकृती मिळणे ही विद्यापीठासाठी सन्मानाची बाब आहे असे कुलगुरू प्रा.डी.टी. शिर्के म्हणाले.

Times of India

# SUK to fund research of 14 universities

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Shivaji University, Kolhapur, will provide scientific research study as well as monetary assistance to 14 universities across India.


Under the special training 'Synergistic Training program Utilising the scientific and Technological Infrastructure (STUTI) of the Central Government, a project of around Rs.2.5 crores has been sanctioned to the SUK. Under this, scientific training will be imparted to students from 14 important educational institutes of the country.

Prof. Dr. R.G. Sonkawade will guide and co-ordinate the project. SUK V-C Dr. D.T. Shirke said, "The purpose is to build human resources, open access to all and expand the supply of infrastructure across the country. An amount of Rs. 8,83,500 will be given to each university through SUK in the training program organized under this initiative.

2 4 MAY 2022
कुमारक्रांती
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'पंगतीतलं पान' जातव्यवस्था आणि अर्थकारणाचा गुंता: डॉ. कोल्हे

कोल्हापूर (प्रतिनिधी) : शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागामध्ये 'हिंदू' आणि 'पंगतीतलं पान' या कादंबरी यांविषयी डॉ. अविनाश कोल्हे यांचे व्याख्यान संपन्न झाले. या कार्यक्रमासाठी ते प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना डॉ. कोल्हे म्हणाले, की 'पंगतीतलं पान' ही कादंबरी गावातील जातीव्यवस्था आणि अर्थकारण तसेच माणसामाणसांतील नातेसंबंधाचा गुंता उलगडून दाखवण्याचा प्रयत्न करणारी कादंबरी आहे. तसेच कादंबरी लेखनाविषयी डॉ.



कोल्हे यांनी विद्यार्थ्यांशी मुक्त संवाद साधला. या कार्यक्रमाचे स्वागत आणि प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी केले याप्रसंगी डॉ. नंदकुमार मोरे प्रमुख उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुस्मिता खुटाळे तर आभार डॉ.सुखदेव एकल यांनी मानले. या कार्यक्रमासाठी एम.ए.चे तसेच शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी उपस्थित होते.

पुण्यनगरी

# विद्यापीठ प्रवेश परीक्षा १० ते १२ जूनदरम्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे १० ते १२ जूनदरम्यान एम.एस्सी. व तत्सम अभ्यासक्रमांसाठी प्रवेश परीक्षा घेण्यात येणार आहेत. ऑनलाईन अर्ज दि. ३१ मेपर्यंत भरता येतील, अशी माहिती विद्यापीठ प्रशासनाने दिली आहे. शिवाजी विद्यापीठातर्फे २०२२-२३ या शैक्षणिक वर्षासाठी विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरिता ऑनलाईन प्रवेश अर्ज मागवण्यात येत आहेत. ज्या अभ्यासक्रमांकरिता प्रवेश परीक्षा आहे, त्या अभ्यासक्रमांकरिता ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम तारीख दि. ३१ मेपर्यंत आहे. प्रवेश परीक्षा दि. १० ते १२ जून यादरम्यान होणार आहेत.

सकाळ

# ऑनलाईन प्रवेश अर्जासाठी अंतिम मुदत ३१ पर्यंत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशाची ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्याची अंतिम मुदत ३१ मेपर्यंत आहे. परीक्षा १० ते १२ जून दरम्यान कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर व बेळगाव येथील प्रवेश परीक्षा केंद्रावर ओएमआर शिटस्‌चा वापर करून ऑफलाईन पद्धतीने होणार आहे. परीक्षेचे वेळापत्रक संकेतस्थळावर www.unishivaji.ac.in/admission २०२२ या लिंकवर प्रसिद्ध केले आहे.

पुढारी

# विद्यापीठाच्या प्रवेश परीक्षा १० जूनपासून

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ या वर्षातील एम.एस्सी. व तत्सम अभ्यासक्रम प्रवेश परीक्षा १० ते १२ जूनदरम्यान होणार आहेत.

ज्या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश परीक्षा आहे, त्या अभ्यासक्रमांकरिता ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम तारीख ३१ मे आहे. प्रवेश परीक्षा दि.१०,११ व १२ जून रोजी कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर व बेळगाव येथील प्रवेश परीक्षा केंद्रावर ओएमआर सीटस्‌चावापरकरूनऑफलाईनपद्धतीने होणार आहे. प्रवेश परीक्षेचे वेळापत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर www.unishivaji.ac.in/admission २०२२ या लिंकवर प्रसिद्ध करण्यात आले आहे. अद्ययावत माहितीसाठी http : //www.unishivaji.ac. in/mscadmission / Admission -२०२२-२०२३ या संकेतस्थळावर भेट द्यावी.

जनसंपर्क कक्ष
24 MAY 2022 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ प्रवेश परीक्षा १० जूनपासून

## ऑफलाईन स्वरूप : कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, बेळगावमध्ये केंद्र

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठातील कला, वाणिज्य, विज्ञान विद्याशाखेतील विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा १० जूनपासून होणार आहेत. ऑफलाईन पद्धतीने या परीक्षा होतील.

२०२२-२३ या शैक्षणिक वर्षासाठी विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरिता ऑनलाईन प्रवेश अर्ज विद्यापीठाने मागविले आहेत. ज्या अभ्यासक्रमांकरिता प्रवेश परीक्षा आहे, त्या अभ्यासक्रमांकरिता ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम तारीख ३१ मे आहे. या प्रवेश परीक्षा १० ते १२ जूनदरम्यान कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर आणि बेळगाव येथील प्रवेश परीक्षा केंद्रांवर ओएमआर शिटसचा वापर करून ऑफलाईन पध्दतीने होणार आहेत. या परीक्षेचे सविस्तर वेळापत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर (www.unishivaji.ac.in/admission२०२२) प्रसिध्द करण्यात आले आहे.

दरम्यान, विद्यापीठ अधिविभागातील आणि संलग्नित महाविद्यालयातील एम.एस्सी.सह अन्य अभ्यासक्रमांचे प्रवेश अर्ज भरण्याची अंतिम मुदत ३१ मे पर्यंत आहे. या मुदतीत अर्ज करण्याच्या अभ्यासक्रमांमध्ये विद्यापीठ अधिविभागातील बी.जे., एम.जे., बी.लिब., एम.ए. इन मास कम्युनिकेशन, एम.ए. इन रशियन, एम.टेक. (यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट), एमबीए (यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट) एमएसडब्ल्यू (यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट), एमबीए (डिस्टन्स मोड), एम.ए. एम.कॉम. एलएल.एम. एम.लिब., एम.आर.एस. (यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट), बी.एस्सी.-एम.एस्सी. नॅनो सायन्स आणि अधिविभागातील विविध डिप्लोमा, पीजी डिप्लोमा, सर्टिफिकेट कोर्सचा समावेश आहे.

### पदवी प्रथम वर्षाची परीक्षा ५ जूनपासून

उन्हाळी सत्रातील पदवी पातळीवरील सर्व पारंपरिक अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षातील प्रथम आणि द्वितीय सत्राच्या परीक्षा ५ जून ते २४ जूनदरम्यान ऑफलाईन स्वरुपात होणार आहेत. महाविद्यालय पातळीवर परीक्षा होतील. पेपर सोडविण्यासाठी प्रत्येक तासाला १५ मिनिटे याप्रमाणे तीन तासांच्या पेपरसाठी ४५ मिनिटे वाढवून मिळणार आहेत. कला, वाणिज्य आणि विज्ञान विद्याशाखेच्या विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षांचा अर्ज आणि शुल्क भरलेल्या विद्यार्थ्यांच्या महाविद्यालय आणि मान्यताप्राप्त शिक्षण संस्थास्तरावर परीक्षा घेण्यास अधिकार मंडळांनी मान्यता दिली आहे. या महाविद्यालय, संस्थांमध्ये ऑफलाईन परीक्षा होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
24 MAY 2022 सकाळ. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



गडहिंग्लज : घाळी महाविद्यालयात आयोजित परिसंवादातील स्पर्धेत यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरणप्रसंगी डॉ. मंगलकुमार पाटील, डॉ. केशव राजपुरे, डॉ. मच्छिंद्र गोफणे, प्रा. विजय सावंत आदी.

# ज्ञानाला संशोधनाची सांगड हवी

## डॉ. केशव राजपुरे; घाळी महाविद्यालयात मायक्रोबायोलॉजीचा परिसंवाद

**सकाळ वृत्तसेवा**

गडहिंग्लज, ता. २३ : "नुसते ज्ञान असून चालणार नाही, तर उपलब्ध ज्ञानाला संशोधनाची सांगड घालणे काळाची गरज बनली आहे," असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे पदार्थविज्ञान विभागप्रमख डॉ. केशव राजपुरे यांनी केले. येथील डॉ. घाळी महाविद्यालयात आयोजित एकदिवसीय राष्ट्रीय विद्यार्थी परिसंवादात ते बोलत होते. प्राचार्य डॉ. मंगलकुमार पाटील अध्यक्षस्थानी होते. विद्याप्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. सतीश घाळी यांच्या हस्ते उद्घाटन झाले. मायक्रोबायोलॉजिस्ट सोसायटी ऑफ इंडियाचे अध्यक्ष डॉ. अरविंद देशमुख यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे परिसंवादात सहभाग घेऊन शुभेच्छा दिल्या.

पहिल्या सत्रात डॉ. राजपुरे यांनी 'भौतिक विज्ञानातील संशोधनाच्या संधी' या विषयावर, तर दुसऱ्या सत्रात शिवाजी विद्यापीठाच्या गणित विभागातील डॉ. मच्छिंद्र गोफणे यांनी 'विज्ञानातील स्पर्धा परीक्षा' या विषयावर मार्गदर्शन मिळाले. त्यानंतर विद्यार्थ्यांसाठी चर्चासत्र, भित्तिपत्रिका स्पर्धा, शोधनिबंध सादरीकरण स्पर्धा घेतल्या. स्पर्धेत संतोष बुरुड, विनायक गायकवाड, मनीषा टिक्का, शुभम गोडसे, अमोघ कोवाडे, स्वाती शिंदे, साक्षी बागडी आदी विद्यार्थ्यांनी पारितोषिके मिळविली. प्रा. विजय सावंत, प्रा. पी. आर. गड्ड्यान्नावर यांनी स्पर्धेचे परीक्षण केले. प्रा. संतोष बाबर यांनी स्वागत केले. प्रा. स्नेहा पाटील, प्रा. नेहा पाटील, प्रा. रूपाली कांबळे, प्रा. स्नेहल जाधव, प्रा. श्वेता पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. महेश कदम यांनी आभार मानले. डॉ. शिवानंद मस्ती, डॉ. राजाराम सावंत, डॉ. किरण पाटील, प्रा. आश्विन गोडघाटे, प्रा. अनिल मगर यांनी परिसंवादाचे नियोजन केले.